जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 JAN 2026

जनप्रवास

# मराठी विश्वकोश हे अधिकृत माहितीचे स्रोत : जत्राटकर

**आजरा : प्रतिनिधी**

समाजमाध्यमांवरील माहिती ही अधिकृत नसते. ती संभ्रम निर्माण करणारी असते; मात्र मराठी विश्वकोश हेच अधिकृत माहितीचे स्रोत आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी येथे केले.

राज्य शासनाच्या मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई आणि आजरा महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. या कार्यशाळेत उद्घाटक म्हणून डॉ. जत्राटकर बोलत होते. अध्यक्षस्थानी जनता एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे होते.



आजरा : आजरा महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. आलोक जत्राटकर. उपस्थित अनिल देशपांडे यांच्यासह मान्यवर.

रोजच्या जीवन व्यवहारात व्हॉटस् अॅप विद्यापीठाच्या आहारी न जाता अधिकृत माहितीचा स्रोत म्हणून विश्वकोश हाताळले पाहिजेत, असे सांगून डॉ. जत्राटकर पुढे म्हणाले, एनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिकाच्या धर्तीवर निर्माण केलेल्या या मराठी विश्वकोशास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सर्वप्रथम भारतीय चेहरा प्रदान केला. विश्वकोशामध्ये नोंदलेखन करण्यासाठी विश्वकोश निर्मिती मंडळाने संबंधित विषयातील तज्ज्ञ अभ्यासक, लेखक व संशोधकांचे सहाय्य घेण्याचे ठरवले आहे. नोंदलेखन करत असताना ती वस्तुनिष्ठ असली पाहिजे. सत्याशी कोणतीही तडजोड न करता नोंदलेखन केले पाहिजे. तसेच नोंदलेखन करताना पूर्वग्रह नसावा, असेही ते म्हणाले.

तीन सत्रांमध्ये संपन्न झालेल्या या कार्यशाळेत डॉ. होमी भाभा संशोधन केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. विजय लाळे, विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक डॉ. स्नेहा खोब्रागडे आणि डॉ. रवींद्र घोडराज यांनी नोंद लेखनासंदर्भात मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. अशोक सादळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेस संचालक कृष्णा येसणे, प्रा. दिलीप संकपाळ, मनोजकुमार पाटील, योगेश पाटील यांच्यासह गडहिंग्लज, आजरा, चंदगड, गारगोटी परिसरातील प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक यांनी सहभाग नोंदवला. डॉ. आप्पासाहेब बुडके यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. आनंद बल्लाळ यांनी आभार मानले.

29 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची 'राजर्षी शाहू संगीत रजनी' स्थगित

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्र शासनाने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे २९ व ३० जानेवारी रोजी आयोजित केलेली राजर्षी शाहू संगीत रजनी स्थगित करण्यात आली आहे, असे अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी कळविले आहे.

29 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पुराभिलेखागार' परिसरात हवा प्रदूषण चाचणी

## पुराभिलेखागार बचाव आंदोलनाचा भाग; शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : भविष्यात करवीर तहसील कार्यालयाच्या पार्किंगमध्ये वाहनांच्या प्रदूषणामुळे हवेत पसरणारे प्रदूषित अतिसूक्ष्म कण ऐतिहासिक दस्तावेजांना धोकादायक ठरू शकतात. याबाबत वेळीच खबरदारी घ्यावी, यासाठी येथे हवेच्या प्रदूषणाची चाचणी घेण्यात आली.

काही महिन्यांपासून पुराभिलेखागार कार्यालय बचाव आंदोलन सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून दुसऱ्या टप्प्यातील ही चाचणी घेण्याचे आंदोलन मराठा सरदार घराण्यांचे वंशज, परीखपूल नूतनीकरण समिती, युथ डेव्हलपमेंट फाउंडेशन, शाहू सेना, महाराष्ट्र क्रांती सेना, इतिहासप्रेमी, इतिहास संशोधक यांच्याकडून करण्यात आले. या ऐतिहासिक दस्तावेजांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचीही हस्तलिखिते असल्याने याचे गांभीर्य लक्षात घेत कोल्हापूर पुराभिलेखागारच्या विनंतीनुसार शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रदूषण चाचणी केली. आठ तास चाललेल्या परीक्षणात शिवाजी विद्यापीठाचे लॅब टेक्निशियन्स अमित माने व सुरज पाटील यांनी 'पीएम-१०', 'पीएम-२.५' मशिनचे मॉनिटरिंग केले. परीक्षणासाठी पुराभिलेखागारच्या सहाय्यक संचालक दीपाली पाटील, संशोधक सहायक सर्जेराव वाडकर आणि कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले. आंदोलनात वैभवराज राजेभोसले, राहूल चौधरी, फिरोज शेख, रियाज डांगे, अतुल पवार, चंद्रकांत कांडेकरी, महेश दिघे, सुशील हंजे सहभागी झाले होते.



कोल्हापूर : पुराभिलेखागार कार्यालय परिसरातील हवेची प्रदूषण चाचणी घेण्याचे आंदोलन केले. यावेळी राहुल चौधरी, चंद्रकांत कांडेकरी, फिरोज शेख आदी.

### 'हेरिटेज'मध्ये पुराभिलेखागारचा समावेश नाही हे दुर्दैवी

ब्रिटिशांनी कोल्हापुरातील सुरुवातीच्या काळात ज्या काही मोजक्या इमारती बांधल्या, त्यात कोल्हापूर पुराभिलेखागारच्या इमारतीचा समावेश आहे, तरीही आजतागायत या इमारतीचा शासनाच्या हेरिटेज यादीत समावेश करण्यात आलेला नाही, ही दुर्दैवी बाब आहे, अशी खंत आंदोलकांनी व्यक्त केली.

29 JAN 2026
सकाळ

# 'शहाजी छत्रपती'चे श्रमसंस्कार शिबिर

कोल्हापूर ता. २८ : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील एन.एस. एस. विभागाचे शिवाजी विद्यापीठांमध्ये निवासी श्रमसंस्कार शिबिर झाले. वृक्षसंवर्धनाचे धडे गिरवले. श्रमदानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कार्यक्रम घेतले.

यात योगासन, व्यक्तिमत्त्व विकास, करवीर महाराणी ताराबाई, युवक आणि मानसिक आरोग्य, पर्यावरण जनजागृती, शिवकालीन मराठा आरमारावर व्याख्याने झाली. एनएसएस विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीवर जिल्हाधिकारी कार्यालयात पथनाट्याचे सादरीकरण केले. शिबिरासाठी विद्यापीठातील कुलगुरू, प्रभारी कुलगुरू, कुलसचिव तसेच राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ संचालक डॉ. टी. एम. चौगुले, सुजित मुंडे, अनिकेत पाटील यांचे सहकार्य लाभले. डॉ. आर. डी. मांडणीकर, रवींद्र भोसले, मनीष भोसले यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय देठे, प्रा. संतोष कांबळे, डॉ. सुनीता राठोड यांनी नियोजन केले.

29 JAN 2026
पुण्यनगरी

# वेटलिफ्टिंगमध्ये विद्यापीठाला सुवर्ण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वेटलिफ्टिंग खेळाडूंनी यश मिळवले. पंजाब युनिव्हर्सिटी, चंदिगड येथे ही स्पर्धा झाली. यशस्वी खेळाडूंची निवड खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेसाठी झाली आहे.

यामध्ये यश खंडागळे याने ७१ किलो वजनी गटात स्नॅच १३४ व क्लीन अँड जर्क १६० असे एकूण २९४ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. महिलांच्या ५८ किलो वजनी गटात निकिता कमलाकर हिने एकूण १८१ किलो वजन उचलून सहावा क्रमांक मिळवला.

संघ व्यवस्थापक म्हणून देवचंद महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र चव्हाण व प्रशिक्षक म्हणून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या खेळाडूंचे शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 JAN 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन

## शिवाजी विद्यापीठात प्रजासत्ताक दिन साजरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले आहे. त्यामुळे हा क्षण मोलाचा व अभिमानास्पद ठरला असल्याच्या भावना उमटल्या आहेत. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) छात्रांनी संचलन करून ध्वजास मानवंदना दिली. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीत सादर केले. ध्वजवंदनानंतर प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह उपस्थित अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी गुरव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. धनंजय सुतार, वसंत एकले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

29 JAN 2026

जनप्रवास

# प्रसारमाध्यमात मराठी भाषेतील विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी

जनप्रवास : कोल्हापूर

बदलत्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळात मराठी भाषेतील विद्यार्थ्यांना प्रसारमाध्यमांत करिअरच्या अनेक संधी आहेत, असे मत गोवा येथील संत सोहीरोबोनाथ अंबिये शासकीय महाविद्यालयातील डॉ. जयप्रभू कांबळे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मराठी विषयांतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या उपक्रमांतर्गत ऑनलाईन आयोजित केलेल्या 'मराठी भाषा आणि करिअरच्या संधी' या विषयाच्या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव विनय शिंदे होते.

डॉ. कांबळे म्हणाले, प्रसारमाध्यम लेखन ही एक कला आहे. समाजाभिमुख व उद्दिष्टपूर्ण लेखन करणे, त्याचबरोबर सामाजिक जबाबदारीवर आधारित लेखन करण्यासाठी प्रसार माध्यमात करियरच्या संधी आहेत. भाषिक कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. उपकुलसचिव शिंदे म्हणाले, मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांनी नोकरी प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. डॉ. नगिना माळी यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया मोगले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 9 JAN 2026 जनप्रवास

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत यशला सुवर्णपदक

**कोल्हापूर :** पंजाब युनिव्हर्सिटी, चंदिगड येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये आपल्या शिवाजी विद्यापीठचा वेटलिफ्टिंग खेळाडू यश खंडागळे यांनी ७१ किलो वजनी गटात स्नॅच १३४ व क्लीन अँड जर्क १६० असे एकूण २९४ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकाविले. तसेच महिलांच्या ५८ किलो वजनी गटात निकिता कमलाकर हिने एकूण १८१ किलो वजन उचलून सहावा क्रमांक मिळवला. या दोघांची निवड खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेसाठी झाली. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच डॉ. रवींद्र चव्हाण व प्रशिक्षक म्हणून डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

29 JAN 2026
सकाळ



## विद्यापीठाची राजर्षी शाहू 'संगीत रजनी' स्थगित

कोल्हापूर, ता. २८ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे शासनाने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे उद्या, गुरुवारी आणि शुक्रवारी आयोजित केलेली राजर्षी शाहू संगीत रजनी स्थगित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाबाबतचे पुढील नियोजन यथावकाश कळविण्यात येईल, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी दिली.

## विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवीवर्षी निधीची तरतूद

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात २०११ मध्ये तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारने विद्यापीठासाठी ४५ कोटींचा सुवर्णमहोत्सवी निधी जाहीर केला होता. त्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती. या निधीची त्यांनी बजेटमध्ये देखील तरतूद केली. या निधीतून गोल्डन ज्युबिली फॅकल्टी हाउस, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च सेंटर अँड म्युझियम कॉम्पलेक्स, कन्व्हेन्शन सेंटर, युवा विकास केंद्र, स्कूल ऑफ नॅनो सायन्स आदी विभागांतील सुविधा, अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन विद्यापीठाने केले.

2 9 JAN 2026
जनप्रवास

# डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील ख्यातनाम अनुवादक, कवी व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम ५१ हजार रुपये व सन्मानचिन्ह असे आहे. ज्येष्ठ लेखक प्रा. राजन गवस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल. अध्यक्षस्थान प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी भूषवणार आहेत. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, प्रा. चंद्रकांत पाटील यांची समीक्षा ही मराठीतील महत्त्वाची समीक्षा आहे. सर्जनशील लेखनाबरोबरच त्यांनी अनुवाद व समीक्षा या प्रकारात महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या लेखनाचे स्वरूप हे द्वैभाषिक आहे. मराठी कविता भारतीय स्तरावर नेण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. मराठी हिंदीतील सांस्कृतिक अनुबंध अधिक विकसित करण्यामध्ये प्रा. पाटील यांचे लेखन महत्त्वाचे ठरले आहे. "आणि म्हणूनच", "आणि तोपर्यंत" व "कवितेसमक्ष" हे त्यांचे महत्त्वाचे समीक्षा ग्रंथ होत. विश्लेषक स्वरूपाची समीक्षा असे पाटील यांच्या समीक्षेचे स्वरूप आहे. १९६० नंतरच्या आधुनिक मराठी साहित्याचा पुरस्कार करण्यामध्ये प्रा. पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे. १९६० नंतरच्या पिढीला मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी लघुनियत कालिकांच्या चळवळीच्या माध्यमातून केलेले लेखन त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. पुरस्काराच्या निवड समितीचे सदस्य म्हणून प्रा. एकनाथ पागर, प्राचार्य गोविंद काजरेकर, प्रा. नंदकुमार मोरे यांनी काम पाहिले.